# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २९५ वा शुक्रवार दि.२३ मे २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## कोरडेवाडी येथील अशोक यादव यांचे विरुद्ध बालविवाहाचा गुन्हा नोंद



केज/ प्रतिनिधी अडीच वर्षांपूर्वी अल्पवयीन मुलीसोबत बालविवाह केल्या प्रकरणी कोरडेवाडी येथील अशोक बारीकराव यादव यांचे विरुद्ध केज पोलिस ठाण्यात बालविवाह आणि बाल लैंगिक अत्याचार कायद्याच्या कलमांनुसार मंगळवारी रात्री ११-०० वाजता गुन्हा नोंद झाला आहे.

बीड तालुक्यातील पिंपरनई येथील अल्पवायीन पीडित मुलीचा बालविवाह आई, वडील व नातेवाईकांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये अशोक बारीकराव यादव रा. कोरडेवाडी त्या.केज जी.बिड यांचे सोबत झाला होता. दरम्यान पीडित अल्पवायीन मुलगी गरोदर राहिल्या नंतर रविवारी दिनांक १८ मे २०२५ तिच्या पोटात दुखु लागल्या मुळे सासरच्या मंडळींनी तीला नेकनूर येथील शासकीय महिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता या महिलेची रुग्णालयात प्रसूती झाली व तीला मुलगा झाला. दरम्यान उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी डॉ मसुरे यांनी महिलेच्या नातेवाईकां कडे आधार कार्डची मागणी केल्या नंतर या पीडितेचा बालविवाह झाल्याचे डॉक्टरच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी ही माहिती नेकनूर पोलिसांना कळविली. अडीच वर्षांपूर्वी हा बालविवाह केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे झाल्यामुळे ही माहिती केज पोलिसांना देण्यात आली. त्या नुसार केज पोलिसात पीडित अल्पवयीन मुलीचा पती अशोक बारीकराव यादव रा. कोरडेवाडी याचे विरुद्ध बालविवाह आणि बाल लैंगिक अत्याचार कलमान्वये गुन्हा नोंद झाला आहे. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत. पीडित अल्पवायीन महिला व बाळ हे नेकनूर येथील रुग्णालयात सुखरूप असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. मसुरे यांनी बोलताना दिली.

## लातूरमध्ये 'हरिश्चंद्र मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'चे उद्घाटन; रुग्णसेवेचे पावित्र्य जपण्याचे आवाहन

लातूर प्रतिनिधी, गुरूवार दि. २२ मे २०२५: सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते आणि राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याप्रमुख उपस्थितीत आज, गुरुवार दिनांक २२ मे रोजी सकाळी लातूर शहरातील औसा रोडवरील 'हरिश्चंद्र मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'चे उद्घाटन करण्यात आले. डॉ. सुदर्शन गुंठे आणि डॉ. अर्पिता गुंठे यांच्या पुढाकाराने स्थलांतरित होऊन, विस्तारित आणि अत्याधुनिक तंत्रसामग्रीसह हे नवीन रुग्णालय सुरू झाले आहे. यावेळी छत्रपती संभाजीनगर मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉक्टर अभय कदम, सचिव डॉक्टर ऋषिकेश हरिदास, ज्येष्ठ विधीज्ञ बी. व्ही. मोतीपवळे, डव्होकेट संभाजीराव पाटील, डॉक्टर हनुमंत किनीकर, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, गणेश एस.आर. देशमुख, आसिफ बागवान, प्रवीण घोटाळे, संगीता मळवणे, निवृत्तीराव गुंठे, शिवाजीराव गुंठे, भालचंद्र गुंठे आदींसह गुंठे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. लातूरच्या वैद्यकीय परंपरेचा गौरव: माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी



यावेळी बोलताना गुंठे कुटुंबाचे कौतुक केले. ते म्हणाले की, गुंठे कुटुंबाने ग्रामीण भागातून आपल्या जीवनाचा प्रवास सुरू करून लातूर येथे वैद्यकीय सेवेला सुरुवात केली आहे. लातूर शहरातील मोक्याच्या ठिकाणी हे रुग्णालय सुरू होत आहे. लातूरने वैद्यकीय सेवेचे नेहमी पावित्र्य राखले आहे. रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा मानून लातूरचे डॉक्टर कार्य करतात. पैसे नाहीत म्हणून रुग्णाला परत पाठवल्याचे उदाहरण लातूरात शोधूनही सापडणार नाही. शिक्षण आणि आरोग्य सेवेवर भर: आमदार देशमुख पुढे म्हणाले, विकासरत्न विलासराव देशमुख साहेबांनी लातूर जिल्ह्यात शाळांचे जाळे विणले, त्यामुळे लातूरात हजारो इंजिनिअर, डॉक्टर, वकील, सीए निर्माण झाले. लातूर आयएमएला जागा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे, ती लवकरात लवकर आम्ही पूर्ण करू. विरोधी पक्ष सर्वसामान्य नागरिकांसाठी लढा देण्याचे काम करतो. आज लातूरमध्ये सर्व व्यवस्था विकसित झालेल्या आहेत. त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या आरोग्य विमा योजनेचा सर्वसामान्य नागरिकांना लाभ मिळवून देण्याचे आवाहन उपस्थित डॉक्टरांना केले. लातूर वैद्यकीय सेवेचे केंद्र: आमदार विक्रम काळे म्हणाले, लातूर आता वैद्यकीय सेवेचे केंद्र बनत आहे. पुणे, मुंबई येथे मिळणाऱ्या वैद्यकीय सेवा लातूरात आज सर्वसामान्य नागरिकांना माफक दरात मिळत आहेत. सद्गुरु गहिनीनाथ महाराजांकडून आशीर्वाद: सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी आपल्या आशीर्वचनात सांगितले की, रुग्णालयात येणारे प्रत्येक रुग्ण बरे होऊन हॉस्पिटलमधून बाहेर पडावेत. देशमुख कुटुंबीयांना लोकसेवेचा वारसा आहे. एक लाख रुपयाने एक काम होत असते, पण एका आशीर्वादाने अनेक कामे होतात. पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सर्वांगीण विकास कामाला गती देण्याचे काम तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेबांनी केले. गुंठे कुटुंबीयांना सर्वसामान्यांच्या परिस्थितीची जाण आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरिश्चंद्र मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुदर्शन गुंठे यांनी केले, त्यांनी हॉस्पिटलची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काजल जगदाळे यांनी केले, तर शेवटी आभार सुभाष पेन्सलवार यांनी मानले.

## लातूरमध्ये काकाज् प्रतिष्ठाण व एसपी पब्लिकेशनतर्फे राज्यस्तरीय गुणगौरव सोहळा संपन्न; आमदार अमित देशमुख यांच्याकडून सत्कारमूर्तींचे कौतुक

लातूर प्रतिनिधी, बुधवार दि. २१ मे २०२५: राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, तसेच महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. २१ मे रोजी सायंकाळी लातूर शहरातील विश्व पॅलेस मंगल कार्यालय येथे काकाज् प्रतिष्ठाण व एसपी पब्लिकेशनच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात शासकीय कामकाजाची उत्कृष्ट प्रणाली राबविणारे कर्तव्यदक्ष अधिकारी आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी काकाज प्रतिष्ठाणने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे मनस्वी कौतुक केले. ते म्हणाले, या ठिकाणी सन्मानित करण्यात आलेल्या सत्कारमूर्तींकडून आपण सर्वांनी प्रेरणा घेत त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून कार्य करावे. आज येथील सर्व सत्कारमूर्तींचे कौतुक त्यांनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कामामुळे सर्वत्र होत आहे, असेच त्यांची प्रगती होत राहो. प्रा. शिवराज मोटेगावकर: एबीपी माझावर एकवेळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री दिसणार नाहीत, पण लातूर पॅटर्नचे ब्रँड म्बेसेडर प्रा. शिवराज मोटेगावकर दररोज रात्री दिसतात, अशा शब्दांत त्यांनी प्रा. मोटेगावकर यांच्या कार्याची प्रशंसा केली. लक्ष्मीकांत करवा: फायब्रो प्लास्ट कंपनीच्या माध्यमातून इमारतींसाठी दर्जेदार दरवाजे ग्राहकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.तुकाराम पाटील: कापड व्यवसायात त्यांचे वस्त्र भांडार नावारूपाला आले असून, त्यांच्या कामाची तोड कोणीही धरू शकत नाही, असे गौरवोद्गार काढले. अशोक काळे: राजकारण व समाजकारणाची परंपरा असलेल्या घरातून आलेले आणि आज विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन म्हणून काम पाहत असलेले अशोक काळे यांचेही त्यांनी कौतुक केले. प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे (राजर्षी शाहू महाविद्यालय): राजर्षी शाहू महाविद्यालयात विद्यार्थी घडविण्याचे त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील काम प्रशंसनीय असल्याचे देशमुख म्हणाले. सपना किसवे आणि प्रा. स्मिताताई खानापूरे लोकप्रतिनिधी म्हणून उत्तम कार्य केलेल्या सपना किसवे आणि प्रा. स्मिताताई खानापूरे यांना आगामी काळात कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून पुन्हा संधी देऊ, असे सांगीतले. आमदार अमित देशमुख यांनी यावेळी शिक्षण क्षेत्रातील ७०/३० कोट्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळत नसण्याच्या समस्येवर भाष्य केले. यावर न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागले आणि ७०/३० कोटा रद्द करणे शक्य झाले, याचा त्यांना समाधान वाटत असून, मराठवाड्यातील शिक्षण प्रणालीला न्याय देऊ शकलो, याचाही त्यांना आनंद असल्याचे त्यांनी व्यक्त केले.



यावेळी आमदार अमित देशमुख पुढे म्हणाले, आता न्यायालयाच्या आदेशानुसार लवकरच निवडणुका होतील. या निवडणूक परीक्षेत आघाडी असेल, युती असेल आणि त्यांची परीक्षा जनता घेईल. ती परीक्षा जनता कशी घेईल, यावर महाराष्ट्र राज्याचे गणित सुटणार आहे. फक्त आपण पेपर फोडू नये, असा सल्ला त्यांनी विरोधकांना दिला. यावेळी छत्रपती संभाजीनगर मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे यांनीही सर्व सत्कारमूर्तींचे अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, हा सत्कार सोहळा म्हणजे आपल्या मातीत कष्ट वेचणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या कष्टाचे फळ आहे. आपल्या सर्वांच्या सहभागातून लातूरच्या नवनिर्मितीचे स्वप्न साकारायचे आहे, यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे. या सन्मान सोहळ्यासाठी छत्रपती संभाजीनगर मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, विभागीय शिक्षण मंडळ लातूर अध्यक्ष तथा सहसंचालक सु.मा.तेलंग, काकासाहेब धुमाळ, विनोद धुमाळ, विजयकुमार धुमाळ, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे, उद्योजक लक्ष्मीकांत कर्वा, शारीरिक शिक्षण महासंघ राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप एन. देशमुख, सिकंदरपूर सरपंच रेशमा माधव गंभीरे, राजर्षी शाहू महाविद्यालयचे प्राचार्य प्रा. डॉ. महादेव गव्हाणे, प्रथम महापौर प्रा. स्मिताताई खानापूरे, लातूर जिल्हा बँक संचालिका सपना किसवे, राहुल गाडे, आनंद सूर्यवंशी, गटशिक्षणाधिकारी दिलीपराव हैबतपूरे, ठउउ लातूर पॅटर्नचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, द्वारकादास श्यामकुमारचे संचालक तुकाराम पाटील, ड. आकाश जाधव आदींसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, धुमाळ कुटुंबीय, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी यांनी केले, तर शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार विजय धुमाळ यांनी मानले.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव येथे घेतली नागरिकांची भेट

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक संभाजी सुळ यांची नात सई अजय सुळ हिने सीबीएसई दहावी परीक्षेत ९०.६०% गुण मिळवून मराठवाड्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल बाभळगाव निवासस्थानी तिचे अभिनंदन केले आणि तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



लातूर प्रतिनिधी, गुरूवार दि. २१ मे २०२५: राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, तसेच महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, गुरुवार दि. २२ मे रोजी सकाळी बाभळगाव येथील निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिकांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी नागरिकांच्या अडीअडचणी आणि समस्या समजून घेतल्या. त्यांच्या निवेदनांचा आणि निमंत्रणांचा स्वीकार करून, संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना दिल्या. याप्रसंगी लोहा कंधार विधानसभेचे माजी आमदार रोहिदास चव्हाण, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, जयश्रीताई उटगे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन सचिन पाटील, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, सूर्यकांत कातळे, लातूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, संभाजी रेड्डी, नारायण पाटील, राजकुमार कत्ते, राजकुमार जाधव, पृथ्वीराज शिरसाट, गोवर्धन मोरे, सूर्यकांत कातळे, संजय चव्हाण, भैरवनाथ इंगळे, निळकंठ पवार, पिंटू साळुंखे, रोहित दयाळ, गोटू यादव, पवन सोमवंशी, सुभाष जाधव, धम्मपाल सोनकांबळे आदींसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## श्री भगवान गौरीशंकर मंदिराचा नावलौकिक राज्यामध्ये वाढविण्याचे काम करू – माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर दि.२२-०५-२०२५ राज्यामध्ये आध्यात्मिक वारसा, जोपासणार्या अनेक मंदिराची उभारणी करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर लातूर शहरातील मार्केट यार्डामध्ये गेल्या ३२ वर्षापूर्वी जगतगुरू शंकराचार्य व मोरारी बापू यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्री भगवान गौरीशंकर मंदिराची उभारणी करण्यात आली. यावेळी सन्माननीय मदनलाल बियाणी, केराळे अप्पा, अरविंदराव सोनवणे व कै. भोसले यांच्यासह मार्केट यार्डातील आडत व्यापारी व अनेक मान्यवरांचे मोलाचे योगदान लाभले होते. यामुळे लातूरकरांचा गौरव वाढलेला आहे. त्यामुळे यापुढील कालावधीतही श्री भगवान गौरीशंकर मंदिर परिसराचा चौफेर विकास करून श्री गौरीशंकर मंदिराचा नावलौकिक राज्यामध्ये वाढविण्याचे काम आपण करू असे प्रतिपादन श्री भगवान गौरीशंकर मंदिर समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते मार्केट यार्डातील श्री भगवान गौरीशंकर मंदिराच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर,भाजपा युवा नेते तथा भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार,दिनकर पाटील मसलगेकर, उपाध्यक्ष नितीन



कोरे, सुभाषअप्पा सुलगुडले,ॲड गंगाधर हामणे, बाबूअप्पा सोलापूरे, सचिव गोवर्धनदास भंडारी, बापूसाहेब गोरे, सहसचिव ब्रिजमोहन मालू, सहसचिव नंदकिशोर सोनी, कोषाध्यक्ष भालचंद्र दानाई, सदस्य नागनाथ मामडगे, संजयकुमार शर्मा, रामभाऊ माळगे, डॉ.आत्माराम झिरमिरे, सतीश पाटील, धोंडीराम सोमवंशी, बाळासाहेब मोहिते,एमएनएस बँकेचे जॉईंट एम.डी.नितीन सराफ, प्राचार्य प्रद्युम्न इगे,गणेश पवार, दिलीपराव पाटील, व्यवस्थापक राजकुमार शेटे, जयेश साखरे, गणेश शेटे, गोटू महाराज, रमेश देशपांडे, प्रकाश शिंदे, साई इटेकर, अनिल उचे, मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण, शुभम शेटे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, वेद, भगवतिगिता, रामायणाच्या माध्यमातून त्रिकोलातील मानवाचे कल्याण करण्याचे काम केलेले आहे. तसेच संत तुकाराम, संत रामदास व महात्मा बसवेश्वर या महात्म्यांनी चुकीच्या पध्दती बाजूला सारून समाजकल्याणाचे कार्य केले. त्यांच्या या देदिप्यमान कार्यामुळे आजही अन्यायाच्या विरोधात लढण्याची ऊर्जा मिळते. या आध्यात्मिक कार्यातून परमेश्वरावरील भक्ती वाढते आणि या माध्यमातून समाज, राष्ट्र आणि देशाच्या प्रगतीची दिशा मिळते असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलताना व्यक्ती केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिर संयोजन समितीच्यावतीने प्रमुख मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार नितीन कोरे यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, बस्वराज सुलगुडले, मुख्याध्यापक आंतेश्वर कपाळे, गणेश कदम, बाबा कदम, बाबूराव बंडगर, साखे अप्पा, उषाताई मगर, संगिताबाई पांडे, सारिका बाई शिंदे, पुजाताई गवळी, लक्ष्मण गायकवाड, सुनिल माळी, लक्ष्मण कांबळे, अनिताताई कांबळे यांच्यासह श्री भगवान गौरीशंकर ट्रस्टचे पदाधिकारी, संचालक, व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, सभासद, भगवान गौरीशंकराचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## उंचावलेल्या शैक्षणिक निकाल आलेखाचे वास्तव

यावर्षी राज्याचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के लागला. मागील वर्षीपेक्षा निकालात घट झाली असली, तरी प्रथम श्रेणीच्या वर गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ही सुमारे ६८ टक्के इतकी आहे. ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणार्यांची संख्या ८० हजारांहून अधिक आहे. गुणांचा उंचावलेला आलेख म्हणजे खरेच बुद्धिमत्तेचे फलित आहे की परीक्षा पद्धतीचे, याचा विचार करण्याची गरज आहे. अन्यथा ही सूज चिंता करायला लावणारी ठरू शकते. गेल्या काही वर्षांत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने आणि मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. उच्च, प्रथम श्रेणी हा जणू नियम बनू लागला आहे. यावर्षी राज्याचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के लागला. मागील वर्षीपेक्षा निकालात घट झाली आहे, हे खरे असले, तरी इतक्या मोठ्या प्रमाणावर गुणांचा उंचावलेला आलेख नेमके कशाचे द्योतक मानायचे? हे गुण म्हणजे खरंच गुणवत्तेत झालेली वाढ आहे की फुगवटा? हा प्रश्न पडणे साहजिक आहे. निकालामधील गुणांच्या खिरापतीबाबत दरवर्षी हल्ली चर्चा होतात.

अलीकडच्या काळात तर शंभर टक्के मार्क मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढत आहे. १०० टक्के निकाल लागणार्या शाळाही वाढताहेत. पूर्वी एखाद्या विषयाला पैकीच्या पैकी गुण मिळाले, तरी त्याची बातमी व्हायची. आज पैकीच्या पैकी गुण मिळूनही त्याचे अप्रुप वाटेनासे झाले आहे. अवतीभोवती डोकावून पाहिले, तर हमखास नव्वदपेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी सापडतील. राज्याच्या श्रेणीनिहाय आकडेवारीवर नजर टाकली, तर परीस्थिती नेमकी आनंददायी आहे की चिंता करायला लावणारी आहे, असा प्रश्न पडतो. आज इतके मार्क मिळवले म्हणजे हमखास विज्ञान शाखेची निवड करायची, हे ठरलेले असते. साहजिकच कला शाखेकडे जाण्याची वाट या गुण फुगवट्याने कायमची बंद केली आहे. गणांच्या उंचावलेल्या आलेखामुळे उत्साह उंचावणे समजण्यासारखे आहे; पण नंतर जे वास्तव हाती लागते ते अधिक चिंता करायला लावणारे आहे. राज्यात यावर्षी दहावीतील १४ लाख ८७ हजार ३९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यातील ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ही सुमारे ८१ हजार ८०९ इतकी (पाच टक्के) आहे. ८५ ते ९० टक्के मार्क मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ही १ लाख ११ हजार ८७८ (७.५२ टक्के) इतकी आहे. ८० ते ८५ टक्के मार्क मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ही १ लाख ३९ हजार ७७४ (९.३९ टक्के) इतकी आहे. ७५ ते ८० टक्के गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांचे प्रमाण १ लाख ५६ हजार ३७५ इतके (१०.५१ टक्के) आहे. ७० ते ७५ टक्के गुण मिळवणारे राज्यात १ लाख ६२ हजार ९५२ (१०.९६) विद्यार्थी आहेत. ६५ ते ७० टक्के गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ही १ लाख ६३ हजार २६ (१०.९६ टक्के) इतकी आहे, तर ६० ते ६५ टक्के मार्क मिळवणारे १ लाख ७६ हजार ४५९ (११. ८६ टक्के) विद्यार्थी राज्यात आहेत.

या आकडेवारीवर नजर टाकली, तर राज्यात दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ४५ टक्के इतकी आहे. साठ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणार्यांचे प्रमाण २३ टक्के आहे. याचा अर्थ राज्यात प्रथम श्रेणीच्या वर गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ही सुमारे ६८ टक्के इतकी आहे, तर ४५ टक्क्यांपेक्षा कमी मार्क मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ही १ लाख २३ हजार २९९९ (८. २९ टक्के) इतकी आहे. विद्यार्थ्यांना मिळालेल्या या गुणांचा आनंद होणे हे मानवी वृत्ती म्हणून समजण्यासारखे आहे; मात्र यातून विद्यार्थ्यांच्या भविष्यासमोर जसे प्रश्न होतात, तसे व्यवस्थेसमोरही प्रश्न निर्माण होत आहेत. आपल्याकडे विद्यार्थ्यांची शाखानिहाय प्रवेशाची प्रक्रिया ही या गुणांवरच ठरते. अभिरुची, कल याचा विचार होत नाही. शाखांना एक प्रकारे प्रतिष्ठेची उतरंड लाभली आहे. विज्ञान शाखा ही अधिक प्रतिष्ठेची मानली जाते. त्यामुळे अधिक गुणमिळाले म्हणजे शंभर टक्के विज्ञान शाखेलाच प्रवेश घेतला पाहिजे अशी धारणा होते. त्या दिशेने प्रवेशासाठी लोंढे निर्माण होतात. यामध्ये अनुकरणशीलतेचा प्रभाव प्रचंड असतो. प्रत्यक्षात आपल्याला नेमकी आवड, गती कशात आहे, हे तपासण्याचा कोणीच प्रयत्न करत नाहीत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ गेली काही वर्षे कल चाचणी घेत होते. त्या चाचणीचा निकालही प्राप्त होत होता; मात्र त्याआधारे विद्यार्थ्यांची शाखा निवड केली जावी, असे मानणार्या पालकांची संख्या अगदी बोटांवर मोजावी एवढीच असते. त्यामुळे सरसकट शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातही विज्ञान शाखेकडे ओढा वाढताना दिसत आहे. याचा परिणाम मेरीटवर होत आहे. आज तालुक्याच्या ठिकाणीदेखील प्रवेशासाठी ९० ते ९५ टक्के गुण मिळाले, तरच प्रवेश मिळण्याची शक्यता असते. अशा वेळी इतर शाखांच्या जागा रिक्त राहण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. यावर्षी साधारण ४५ टक्क्यांपेक्षा कमी गुण असलेले विद्यार्थी १ लाख २३ हजार आहेत. ४५ ते ६० टक्के गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची संख्या ३ लाख ७१ हजार ८२० इतकी आहे. यातील ५० टक्के विद्यार्थ्यांचा ओढा हा अर्थात विज्ञान शाखेकडेच असणार, यात शंका नाही. यातील काही वाणिज्य शाखेला पसंती देतील; मात्र ६५ पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी आणि माता-पित्यांचा कल विज्ञान शाखेकडे असणार. त्यातून राज्यात कला शाखेला प्रवेश घेणारे विद्यार्थी मिळत नाहीत, हेही वास्तव लक्षात घ्यायला हवे. यामध्ये एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, प्रथम आणि उच्च श्रेणी मिळाली म्हणून विज्ञान शाखेला जाणार्या विद्यार्थ्यांपैकी किती टक्के विद्यार्थी दहावीइतके मार्क बारावीत मिळवतात? बहुतेकदा हा आलेख घसरलेला असतो. उच्च श्रेणीतील विद्यार्थी द्वितीय श्रेणीत येऊन पोहोचतात. अगदी शिकवणी लावूनही तीच अवस्था अनुभवास येते.

मुळात परीक्षांमध्ये मिळणार्या गुणांवरून कोणत्या शाखेला प्रवेश घ्यावा, हे ठरवले जात असेल, तर पदरी निराशा येणे स्वाभाविकच आहे. दहावीत पैकीच्या पैकी गुण मिळवणारे विद्यार्थी जेईई, नीटसारख्या प्रवेश परीक्षांच्या वेळी का चमकत नाहीत? केंद्रीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांमध्ये आपला फार मोठा वरचष्मा आहे असे दिसत नाही. सध्या मिळणारे गुण म्हणजे अंतर्गत गुणांचा परिणाम आहे का? यासंदर्भाने देखील वास्तवाचा अभ्यास होण्याची गरज आहे. बाह्यमूल्यमापनाच्या प्रमाणात अंतर्गत गुण दिले गेले, तर भविष्यात निकालाच्या शेकडा प्रमाणात निश्चित घट झालेली दिसून यईल. मुळात अंतर्गत मूल्यमापनाचे उद्दिष्ट, हेतू चांगला असूनही त्याकडे पाहण्याचे गांभीर्य संपुष्टात आल्याने निकालात वाढ झालेली अनुभवास येते. त्यामुळे निकालाच्या संदर्भाने वास्तवाचा विचार करायला हवा.

# इन्फ्लुएन्सरची हेरगिरी

गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यानंतर सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्ममध्येही वाढ झाली. या प्लॅटफॉर्मचा वापर करून आपला कंटेंट समाजातील विविध थरांपर्यंत पोचवून आणि प्रतिसाद मिळवून चांगले उत्पन्न मिळवणारे काही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरही तयार



झाले आणि लोकप्रियही झाले. अशा प्रकारे आपल्या एखाद्या कृतीला प्रतिसाद मिळवून त्या माध्यमातून पैसे मिळवणे ही जरी सर्वसामान्य गोष्ट असली, तरी या सोशल मीडियाचा वापर करून जेव्हा शत्रुराष्ट्रासाठी हेरगिरी केली जाते तेव्हा सोशल मीडियाची ही दुसरी बाजू भीषणपणे समोर येते. गेल्या काही दिवसांमध्ये भारतात विविध ठिकाणी पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी ११ जणांना अटक केली आहे. ते सर्वजण सोशल मीडियाशी संबंधित असून इन्फ्लुएन्सर्स म्हणून लोकप्रिय आहेत.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विविध पातळीवर तपास सुरू असतानाच लोकप्रिय युट्यूबर ज्योती मल्होत्राला पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआयसाठी हेरगिरीप्रकरणी अटक केली आहे. आणखी काही जणांना याच संदर्भात अटक केली आहे. ज्योती मल्होत्रा आणि इतर सर्व युट्यूबर किंवा सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर यांचा विचार करता त्यांनी पैसे मिळवण्यासाठी या सर्व गोष्टी केल्या हे उघड आहे. पण यानिमित्ताने पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तहेर संघटनेची एक वेगळी योजना समोर आली आहे हे सर्वात जास्त महत्त्वाचे आहे. पाकिस्तानच्या आयएसआयच्या माध्यमातून देशात हेरगिरी केली जाते हे काही नवीन नाही.

देशाच्या कानाकोपर्यामध्ये महत्त्वाच्या शहरांमध्ये स्लीपर सेल डेव्हलप करून त्यांच्या माध्यमातून माहिती मिळवण्याचे आणि दहशतवादी हल्ल्याच्या वेळी सहाय्य घेण्याचे कामही केले जाते, असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. कोणत्याही देशाची गुप्तहेर संघटना इतर देशांमध्ये आपल्या संघटनेच्या माध्यमातून गुप्त माहिती मिळवण्याचे काम करतच असते. देशात आयएसआय संघटनेचे अधिकृत एजंटही असे अधूनमधून पकडले जात असतात. पण ते शिक्षित एजंट असतात. ज्या प्रकारे सोशल मीडियाचा वापर करणार्या आणि लोकप्रिय झालेल्या काही महत्त्वाच्या इन्फ्लुएन्सर्सचा हेरगिरीसाठी वापर करण्याची रणनीती आयएसआयने आखली आहे, त्याचा विचार आता गांभीर्याने करावा लागणार आहे.

अनेक वेळा हे सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स आपल्या लोकप्रियतेच्या किंवा त्यांना मिळणार्या लाइक्स आणि कॉमेंटच्या भरामध्ये वाहून जातात आणि आपण कशा प्रकारचा कार्यक्रम पेश करत आहोत याचे त्यांना भानही राहात नाही. आपण शत्रू राष्ट्राच्या ट्रॅपमध्ये अडकत आहोत त्याची कल्पनाही त्यांना येत नाही. ज्या प्रकारे हनी ट्रॅपचा वापर करून सरकारी अधिकारी किंवा दूतावासातील कर्मचारी यांना अडकवले जाते आणि त्यांच्याकडून महत्त्वाची माहिती मिळवली जाते, त्याच प्रकारे आता या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सचा वापरही आयएसआयकडून केला जात आहे. भारतासारख्या लोकशाही देशामध्ये सोशल मीडिया वापरकर्ते जेव्हा सरकार विरोधी किंवा देश विरोधी भूमिका घेतात तेव्हा त्याला काही प्रमाणात लाइक्स आणि कॉमेंट्सही मिळतात.

अशाप्रकारे भारत विरोधी किंवा सरकारच्या धोरणाविरोधी भूमिका घेणार्या सोशल मीडियाच्या शोधातच पाकिस्तानची आयएसआय गुप्तहेर संघटना आहे असे दिसते. ज्योती मल्होत्राला अटक केल्यानंतर जो तपास झाला त्यामध्ये जी माहिती समोर आली आहे त्यामध्ये अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ज्योतीला पाकिस्तानची हेर म्हणून तयार करण्यात आले हे दिसत आहे. ज्योती मल्होत्राने गेल्या काही महिन्यांमध्ये अनेक वेळा पाकिस्तानचा प्रवास केला आणि पर्यटक म्हणून तेथील काही चित्रण आपल्या युट्यूब चॅनेलवर प्रदर्शित केले. या एका कारणामुळे ज्योतीवर कारवाई करण्यात आलेली नाही.

तर अत्यंत जाणीवपूर्वक ती पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेसाठी काम करत होती असेही लक्षात आले आहे. महत्त्वाची गोष्ट अशी आहे की देशातील जो अधिकृत मीडिया आहे म्हणजे वृत्तपत्रे किंवा वृत्तवाहिन्या त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या यंत्रणा आहेत आणि सरकारी यंत्रणाही आहेत. पण या सोशल मीडियावर कंटेंट क्रिएट करणार्या लोकांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. गेल्या काही कालावधीमध्ये वादग्रस्त वक्तव्य किंवा वादग्रस्त कार्यक्रम सादर करून अडचणीत आलेल्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सचा विचार केला, तर आपण काय सादर करत आहोत त्याचे भान राहात नसल्याने हे सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स अडचणीत येऊ लागले आहेत.

देशांतर्गत धोरणाला विरोध केला किंवा आक्षेपार्ह वर्तन केले किंवा विधाने केली म्हणून एखादा सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरने अडचणीत येणे वेगळे आणि पाकिस्तानसारख्या शत्रू राष्ट्रासाठी हेर म्हणून काम केले म्हणून अडचणीत येणे वेगळे. ज्योती मल्होत्राच्या प्रकरणामुळे सोशल मीडियाची ही एक वेगळी बाजू समोर आली आहे आणि सरकारला त्याची गांभीर्याने दखल घ्यावी लागणार आहे. येत्या काही कालावधीमध्ये आणखी काही लोकांना अटक होण्याचीही शक्यता आहे.

अर्थात, शत्रू राष्ट्राला काही महत्त्वाची माहिती देणे ही जेवढी गंभीर गोष्ट आहे तेवढीच गंभीर गोष्ट देशविरोधी वातावरण तयार करणे हीसुद्धा आहे. अनेक वेळा या सोशल मीडियाचा वापर करून पाकिस्तानी गुप्तहेर संघटना भारत विरोधी वातावरण तयार करण्याला चालना देऊ शकतात हा धोकाही या निमित्ताने लक्षात घ्यायला हवा. साहजिकच अशा प्रकारे सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना केवळ अटक करून या विषयाला पूर्णविराम मिळणार नाही तर देश विरोधी वातावरण तयार करण्यासाठी जाणीवपूर्वक पाकिस्तानमधून काही मदत मिळते आहे का हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरचा हा इन्फ्लुएन्स देशासाठी घातक ठरणार नाही हे आता पहावेच लागणार आहे.

# पक्षी जाई दिगंतरा

स्थलांतरित पक्ष्यांची शिकार झाल्याने शेकडो ग्रीष्मकालीन स्थलांतरित पक्षी मायदेशी परतू शकले नाही. शिकारीमुळे गेल्या तीन दशकांत पक्ष्यांच्या दुर्मिळ २३ प्रजाती लुप्त झाल्या. पक्ष्यांसाठी आजचे जग अधिकच असुरक्षित बनले आहे. एकीकडे हवामान बदल, पाणथळ भागांचा र्हास, कीटकनाशकांचा अतिरेक, शहरी विकासामुळे त्यांच्या अधिवासाचे नुकसान होत आहे, तर दुसरीकडे शिकारीच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बरेचदा ही शिकार केवळ मजेसाठी, मांस विक्रीसाठी किंवा अंधश्रद्धेमुळे केली जाते. परिणामी दुर्मिळ आणि स्थलांतरित पक्ष्यांची अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. कोविड काळात शुकशुकाट होता. परंतु पक्ष्यांची किलबिल वाढली होती. स्थलांतरित पक्षी बिनधास्तपणे अभयारण्य आणि सरोवराच्या काठावर दाखल होत होते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे या काळात स्थलांतरित पक्ष्यांना मिळालेली स्वच्छ हवा, प्रदूषणाचे प्रमाण कमी झाल्याने उपलब्ध झालेले निर्मळ पाणी आणि लोकसमूहांची वर्दळ, शिकार, गोंगाट यांपासून मुक्त झालेले, त्यांच्या प्रकृतीनुरूप वातावरण. याचा परिणाम म्हणजे या काळात पक्ष्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढली. पण या स्थितीवर विरजण टाकण्याचे काम पुढील काळात लागलीच सुरू झाले.

गेल्या शंभर वर्षांचा अभ्यास केल्यास यापूर्वी म्हणजे तीन दशकांपूर्वी सरासरी एक प्रजात नामशेष होत असे. याचाच अर्थ वैशिष्ट्यपूर्ण भारतीय पक्षी आणि स्थलांतरित पक्ष्यांची शिकार गेल्या ३५ वर्षांत वाढली आहे. स्थलांतरित पक्ष्यांमधील कॉमन कूट, ब्लॅक विंग्ड स्टिल्ट, नदन ङ्गावडे, रुडी शेल्डङ्ग, लेसर व्हिस्लिंगडक, वाईड एवोसेट पक्षी आणि भारतात दरवर्षी न चुकता येणारे मूळ कॅस्पियन पक्ष्यांची शिकार मोठ्या प्रमाणावर होत आहे. 'इंटरनॅशनल युनियन ङ्गॉर कंझर्व्हेशन ऑङ्ग नेचर'च्या मते, शिकारीत झालेली वाढ आणि सध्याची पर्यावरण स्थिती पाहता देशात वास्तव्य करणारे सुमारे १८० पक्षी लुप्त होण्याच्या उंबरठ्यावर आहेत किंवा धोक्यात आहेत. स्थलांतरित आणि देशातील पक्ष्यांच्या संरक्षणासाठी आणि त्यांना स्वातंत्र्य बहाल करण्यासाठी देशात कायदे आहेत, मात्र या कायद्याची अंमलबजावणी कडकपणे होत नसल्याने या पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.



स्थलांतरित पक्षी सातासमुद्रापलीकडून निरंतन प्रवास करत, प्रचंड मोठे अंतर कापत भारतात दाखल होतात. सोबत संस्कृतीचा वारसा घेऊन येणारे हे निसर्गसखे देशादेशांच्या परंपरा जोडण्याचे काम करतात. हे पक्षी वाळवंट, समुद्र आणि पर्वतरांगा ओलांडत एका देशातून दुसर्या देशांत मुक्तविहार करतात. पक्ष्यांच्या ज्ञात असलेल्या प्रजातींपैकी सुमारे १९ टक्के पक्षी नियमितरूपाने प्रवास करतात. स्थलांतरित पक्षी हे जैवविविधतेचा भाग असतात. हे पक्षी पर्यावरणीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे असतात. ते कीटक नियंत्रणात मदत करतात, परागसिंचनात मोलाची भूमिका बजावतात. तसेच पर्यावरणाचा जैविक समतोल राखतात. मात्र, त्यांच्या विश्रांतीसाठी आवश्यक असलेली पाणथळे, जंगले आणि सुरक्षित अधिवास आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे वेळीच संरक्षण केले नाही तर येत्या काही वर्षांत स्थलांतरित आणि देशी पक्षी हे इतिहासजमा होण्याची शक्यता आहे. जगप्रसिद्ध सांभर सरोवर (राजस्थान) असो किंवा गिरडीह (झारखंड) आणि भरतपूर (राजस्थान) येथील केवलानंद अभयारण्य असो, या ठिकाणी आता पक्षी येण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. डुंगरपूर, बान्सवाडा, उदयपूर येथे देखील पूर्वी पक्ष्यांचे थवे येत असत. पण आता त्यात घट झाली आहे. पक्ष्यांची शिकार पूर्वीपासून मानव करत आला आहे. पूर्वी ती उपजीविकेसाठी मर्यादित प्रमाणात होत असे. पण आज ती मजेसाठी, अवैध व्यापारासाठी, खाद्य म्हणून, धार्मिक अंधश्रद्धांमुळे किंवा सौंदर्यप्रदर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर होत आहे. काही दुर्मिळ आणि रंगीबेरंगी पक्ष्यांना पिंजर्यात ठेवण्यासाठी पकडले जाते. काही भागांमध्ये अजूनही पारंपरिक समारंभांत पक्ष्यांचा बळी दिला जातो. काही पक्ष्यांचे मांस 'औषधी' म्हणून वापरले जाते. वास्तविक, पक्ष्यांची घटती संख्या कृषी क्षेत्रावर परिणाम करणारी, कीटकांच्या संख्येत वाढ करणारी आणि नैसर्गिक संतुलन बिघडण्याचा धोका अधिक गडद करणारी ठरणार आहे.

पक्ष्यांच्या जीवावर येणारी गंडातरे पाहता त्यांच्या अस्तित्वाची जोपासना करण्यासाठी राजस्थानातील मेनार येथे ग्रामीण पर्यावरण संरक्षणाचा नवीन अध्याय लिहिला गेला. या माध्यमातून पक्ष्यांचा जीव वाचविण्याची भावना देशातील अन्य भागातही पोचली तर पक्ष्यांची सुरक्षा आणि संरक्षणाची काळजी संपेल. भारतात पक्ष्यांच्या १२०० पेक्षा अधिक प्रजाती आणि उपप्रजातीचे सुमारे २१०० प्रकार आढळून येतात. यापैकी सुमारे ३५० प्रजाती स्थलांतरित असून ते देशातील वेगवेगळ्या भागात हिवाळा आणि ग्रीष्म ऋतूत येतात. पाईड क्रेस्टेड कक्कू (चातक) सारख्या काही प्रजातीतील पक्षी पावसाळ्यात येतात. स्थानिक पातळीवर स्थलांतरित पक्षीदेखील मोठ्या संख्येने देशातील एका भागातून दुसर्या भागाकडे जातात. बिहारमध्ये पक्ष्यांच्या ३५ ते ४० टक्के प्रजाती स्थलांतरित आहेत.

देशात एकीकडे स्थलांतरित पक्ष्यांचा विहार सुरू असताना त्यांच्या शिकारीचे प्रमाण वाढले आहे. भरतपूरच्या केवलनंद क्षेत्राबरोबरच बिहार येथील राष्ट्रीय राज्यमहामार्गावरील विहपूर (ङ्गतुहा), बेगुसराय, कुशेश्वरस्थान (दरभंगा), पाटणा शहर यासारख्या भागांत शिकारीचे प्रमाण गंभीर आहे. भारतामध्ये शिकारीविरुद्ध 'वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२', जैवविविधता अधिनियम २००२ आणि 'पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६' यांसारखे कायदे अस्तित्वात आहेत. शिकारीसाठी शिक्षा आणि दंडही निश्चित आहेत. पण अंमलबजावणीत गंभीर त्रुटी, स्थानिक प्रशासनाची उदासीनता आणि सामान्य लोकांमध्ये माहितीचा अभाव यामुळे ही समस्या थांबत नाही.

भारतात पूर्वी जीवांचे संरक्षण आणि सुरक्षेची भावना सर्वांच्या मनात असायची; परंतु ती आता दिसत नाही. काही भागातील स्थानिक नागरिक पक्ष्यांना वाचविण्याऐवजी शिकार्यांना मदत करताना दिसतात. अशा वेळी या मुक्या स्थलांतरित पक्ष्यांचा वाली कोण, हा खरा प्रश्न आहे. बर्ड लाइफ इंटरनॅशनल आणि आययूसीएनच्या माहितीनुसार, भारतात १४ पेक्षा अधिक पक्षीप्रजातींना 'क्रिटिकली एनडेंजर्ड' म्हणजेच 'अत्यंत संकटात' या श्रेणीत ठेवले आहे. ट्रॅफिक इंडिया (वन्यजीव व्यापार प्रतिबंध संस्था) च्या अहवालानुसार, २०२२ या ङ्गक्त एका वर्षात बाजारात विकण्यासाठी नेण्यात येणार्या ३० हजारांपेक्षा अधिक पक्षी अवैधरित्या ताब्यात घेण्यात आले होते.

यात अलेक्झांडरीन पॅराकीट, रेड टर्टल डोव्ह, ब्लॅक हेडेड मुनिया, इतर अनेक स्थलांतरित जलपक्ष्यांचा समावेश होता. शिकारीचा प्रश्न केवळ कायदेशीर नव्हे, तो नैतिक आणि मानवी करुणेचा प्रश्न आहे. प्रत्येक सजीवाला जगण्याचा हक्क आहे. केवळ मनुष्य प्रबुद्ध आहे म्हणून निसर्गावर एकाधिकार गाजवण्याचा त्याला अधिकार नाही. त्यामुळे याबाबत सरकारांनी आणि कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असणार्या संस्थांनी पक्ष्यांबाबतची उदासीनता सोडून दिली पाहिजे. तसेच यासंदर्भात देशव्यापी जनजागृती मोहीम राबविली गेली पाहिजे. तरच मानवाचे मित्र असणारे आणि निसर्गसाखळीत महत्त्वाची भूमिका असणारे पक्षी आनंदाने मुक्तविहार करू शकतील.

## विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानासोबतच स्वतःच्या बुध्दीचा वापर करावा : कुलगुरू डॉ. चासकर आयटी कंपन्यांमध्ये नोकर्या मिळालेल्या कॉक्सिटच्या १७३ विद्यार्थ्यांचा सत्कार



लातूरः आयटी कंपन्यांमध्ये नोकर्या मिळविल्या. त्यामध्ये अधिकाधिक कौशल्य दाखवून पुढे जाण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, नव्याने आलेल्या एआय तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी स्वतःच्या बुध्दीचा अधिक वापर करून जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.
येथील कॉक्सिट महाविद्यालयातील १७३ विद्यार्थ्यांना यावर्षात विविध नामांकित कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीत नोकर्या मिळाल्या आहेत. त्यांच्यासह पालकांचा कॉक्सिट महाविद्यालयात गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. चासकर बोलत होते. अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, प्रबंधक संतोष कांबळे उपस्थित होते.
डॉ. चासकर म्हणाले, पुढील ३० वर्षांचा वेध घेऊन डॉ. एम. आर. पाटील यांनी संगणक महाविद्यालयाची स्थापना केली. याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी आयटी क्षेत्रात उच्च पदांवर देश-विदेशात कार्यरत आहेत. हे महाविद्यालयाचे काम कौतुकास्पद आहे. कॉक्सिट मराठवाड्यात एकमेव महाविद्यालय आहे. इतर महाविद्यालयांनी या महाविद्यालयाचा आदर्श घ्यावा. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकाव लागण्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्याधिष्ठित शिक्षण घेण्याची गरज आहे. इतर महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांना कौशल्यक्षम बनवण्यासाठी पुढाकार घ्यावा, प्रत्येक महाविद्यालयात एक कौशल्य धोरण राबवावे, असे ते म्हणाले. पुढे ते म्हणाले, प्रभावी संवाद कौशल्य असल्यास आयटी क्षेत्रात विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी आहेत. आधुनिक तंत्रज्ञानातील क्रांतीचा भाग असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) महत्व सांगितले. 'एआय'वर पूर्णतः अवलंबून न राहता स्वतःच्या बुद्धीचा वापर करणे अधिक महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले.
अध्यक्षीय समारोपात डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्याची, म्हणजेच आत्मनिर्भर होण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी एवढ्यावरच न थांबता पुढील शिक्षणही सुरु ठेवावे. त्यांना त्यांच्या क्षेत्रात उत्तम जॉबच्या संधी उपलब्ध होतील, असे ते म्हणाले. प्रास्ताविक ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे व प्रा. आरती पाटील यांनी केले.

## शिवाजीराव पाटील कव्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के गुणवत्तेची परंपरा कायम : पहिल्यावर्षी गुणवत्तेत मुलींची यशस्वी भरारी





लातूर दि.२२-०५-२०२५ जेएसपीएम संचालित शिवाजीराव पाटील कव्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचा पहिल्या वर्षाचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून या युनिटच्या माध्यमातून गुणवत्तेची परंपरा कायम ठेवली असल्याची माहिती प्राचार्य डॉ.प्रद्युम्न इगे यांनी दिली.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्यावतीने बी.फार्मसी पदवी अभ्यासक्रमाचा निकाल नुकताच जाहीर केला असून या निकालात शिवाजीराव पाटील कव्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाने भरीव यश संपादन केले आहे. यामध्ये मोहिणी प्रदीप जाधव या विद्यार्थीनीने ८.६२ एसजीपीए गुण घेऊन पहिला क्रमांक पटकाविला आहे तर निकीता अमृत जाधव या विद्यार्थीनीने ८.२२ एसजीपीए गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. पहिल्याच वर्षात मुलींनी गुणवत्तेत बाजी मिळविली असल्यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.
महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी प्रशस्त इमारत, अद्यावत प्रयोगशाळा, डिजिटल वर्ग, सुसज्ज ग्रंथालय, आधुनिक सुविधांनी युक्त संगणक कक्ष आणि मनमिळाऊ प्राचार्य व शिक्षिकेत्तर कर्मचार्यांचा मोलाचा वाटा आहे. याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबीर, नामांकित कंपन्यामधील व्यक्तींचे मार्गदर्शन, बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये नोकरीची संधी असे अनेक उपक्रम महाविद्यालयात राबविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा व त्यांच्यामधील आत्मविश्वास उंचावला आहे.
विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, जेएसपीएम संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे वित्तीय संचालक बापूसाहेब गोरे, समन्वयक विनोद जाधव, प्रा.मयुर मरेवाड, प्रा.ऋषिकेश पाटील यांच्यासह शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचार्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.


## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना शिवमहापुराण कथेचे



निमंत्रण; शिवतीर्थ प्रतिष्ठानच्या शिष्टमंडळाची भेट राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची शिवतीर्थ प्रतिष्ठान लातूरच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. या भेटीदरम्यान प्रतिष्ठानने आंतरराष्ट्रीय कथाकार प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेचे निमंत्रण आमदार देशमुख यांना दिले. लातूर जिल्ह्यातील तुळजापूर रोड, औसा येथे दिनांक ३० मे ते ५ जून या दरम्यान या कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शिष्टमंडळाने आमदार देशमुख यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. याप्रसंगी शिवतीर्थ प्रतिष्ठान लातूरचे अध्यक्ष जयकुमार बनसोडे, पंडित कावळे, नेताजी बादाडे, लालासाहेब पाटील, जुगलकिशोर राठानी, विवेक साळुंखे, बालाजी माने, गोविंद सोनवणे आदी उपस्थित होते.

# चाळिशीनंतर किडनी कर्करोगाच्या 'या' लक्षणांकडे करू नका दुर्लक्ष; जाणून घ्या, कशी घ्यावी काळजी?

आजच्या धावपळीच्या आयुष्यात आरोग्याला प्राधान्य देणे खूप महत्त्वाचे आहे. वयाची चाळिशी ओलांडल्यानंतर आपण काम, कुटुंब व वैयक्तिक आरोग्य जपत संतुलन राखण्याचा प्रयत्न करतो. अनेक लोक हृदयाचे आरोग्य चांगले जपण्याचा, तसेच वजन नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करतात; पण किडनीच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. किडनीच्या कर्करोग प्रकरणांमध्ये अलीकडे वाढ झाली आहे. या कर्करोगासंबंधित धोका जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. किडनीचा कर्करोग हा प्रामुख्याने किडनीच्या असामान्य पेशींच्या वाढीमुळे उद्भवतो, ज्यामुळे ट्यूमर होतो. वयानुसार हा धोका वाढत जातो आणि त्यामुळे वयाच्या चाळिशीत लक्षणे लवकर ओळखणे आणि धोकादायक घटकांना समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आरोग्यावर सकारात्मक फरक जाणवू शकतो. किडनीच्या कर्करोगाची लक्षणे नाशिक येथील एचसीजी मानवता कॅन्सर सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक व सर्जिकल ऑन्कोलॉजीचे प्रमुख डॉ. राज नगरकर हे किडनीच्या कर्करोगाची सुरुवातीच्या टप्प्यातील लक्षणे ओळखणे किती महत्त्वाचे आहे याविषयी सांगतात. किडनीच्या कर्करोगामध्ये सुरुवातीच्या टप्प्यात अनेकदा लक्षणे दिसून येत नाहीत; पण हा कर्करोग जसजसा वाढत जातो, तसतशी लक्षणे दिसू लागतात. लघवीमधून रक्त येणे : यामुळे लघवी लालसर किंवा तपकिरी दिसू शकते. जर असे दिसून आले, तर त्वरित आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. पाठीच्या खालच्या भागात सातत्याने होणारी



वेदना (पाठदुखी) : आराम करूनही सतत पाठदुखी जाणवत असेल, तर किडनीमध्ये समस्या असल्याचे ते एक लक्षण असू शकते. वजन कमी होणे : आहार किंवा व्यायाम किंवा शारीरिक हालचाली यांमध्ये कोणताही बदल न केल्याशिवायही वजनात लक्षणीय घट दिसून येत असेल, तर ते किडनी किंवा इतर कर्करोगांसाठी धोक्याचे लक्षण असू शकते. सूज येणे किंवा अवयव फुगणे : ओटीपोट, पाय किंवा घोटा यांमध्ये द्रवपदार्थ साचल्याने सूज येत असेल किंवा अवयव फुगत असेल, तर ते किडनीचे कार्य बिघडल्याचे लक्षण असू शकते. वारंवार लघवी येणे : जर तुम्हाला वारंवार लघवी होत असेल आणि विशेषतः रात्रीच्या वेळी तुम्ही वारंवार लघवीसाठी झोपेतून उठत असाल, तर तुम्ही आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक आहे. ताप येणे किंवा रात्री घाम येणे : सतत ताप येत असेल किंवा रात्री खूप घाम येत असेल, तर ते लक्षण किडनीची समस्या असल्याचे दर्शवते. खालील उपाय तुम्ही करू शकता आनुवंशिक आजारासारखे धोकादायक घटक नियंत्रित करता येत नसले तरी निरोगी जीवनशैलीचा वापर करून तुम्ही धोका कमी करू शकता, असे डॉ. नगरकर सांगतात. वजन नियंत्रित ठेवणे : लठ्ठपणा हा एक धोकादायक घटक आहे. तुम्ही संतुलित आहार आणि नियमित व्यायामाद्वारे वजन कमी करू शकता. धूम्रपान टाळा : तंबाखूच्या सेवनाने किडनीच्या कर्करोगाची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते. धूम्रपान सोडल्याने हा धोका कमी होतो. मद्यपान मर्यादित करा : अतिप्रमाणात मद्यपान केल्याने किडनीचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. हायड्रेटेड राहा: भरपूर पाणी प्यायल्याने किडनीचे कार्य आणि एकूण आरोग्य सुधारण्यास मदत होते.

रक्तदाब नियंत्रणात ठेवणे : अनियंत्रित उच्च रक्तदाब किडनीवर ताण आणू शकतो, त्यामुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. जर तुम्हाला धोकादायक लक्षणे किंवा घटक जाणवत असतील, तर त्वरित आरोग्य तज्ज्ञाचा सल्ला घ्या. सुरुवातीच्या टप्प्यात किडनीच्या कर्करोगावर उपचार केले, तर ते फायदेशीर ठरू शकते. ही लक्षणे समजून घेण्यासाठी आरोग्याची नियमित तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे.

## आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत तांदूळजा येथील अनेकजण भाजपात

लातूर दि २२ - लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथील काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.



तांदूळजा गावासह परिसरातील अनेक गावात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन तांदूळजा येथील काँग्रेसच्या अनेकांनी भाजपात जाहीर प्रवेश केला यावेळी भाजपाचे मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, महादेव गायकवाड, अंकुश गंणगे, विष्णू कसबे, शहानुर बागवान यांच्यासह अनेक जण होते.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तांदूळजा येथील ग्रा.प. सदस्य सचिन कांबळे, कल्याण गालफाडे, शैलेश कसबे, अजय लांडगे, अमर घोडके, विजय लांडगे, कृष्णा चव्हाण, सचिन लांडगे, लखन हजारे, आकाश चव्हाण यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. सर्वांना सन्मानाची वागणूक मिळेल अशी ग्वाही आ. कराड यांनी यावेळी दिली.

## लातूर जिल्ह्यातील नदीकाठावरील नागरिकांना सावधानतेचा इशारा

लातूर, दि. २२ (जिमाका): मांजरा, तेरणा आणि तावरजा नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात सध्या पावसाचा जोर वाढत आहे. ह पावसाचा हा वेग कायम राहिल्यास मांजरा, तावरजा व तेरणा नदीवरील प्रकल्प आणि कोल्हापुरी पद्धतीच्या बंधारे लवकरच निर्धारित पाणी पातळीपर्यंत भरतील, अशी शक्यता आहे. यामुळे प्रकल्पांमध्ये येणारे अतिरिक्त पाणी मांजरा, तेरणा आणि तावरजा नद्यांमार्फत सोडावे लागेल.
या पार्श्वभूमीवर मांजरा, तेरणा आणि तावरजा नदीकाठावरील शेतकरी तसेच नदीकाठी वस्ती करणाऱ्या नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी नदीकाठच्या भागात अनावश्यक प्रवेश टाळावा, तसेच आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## लातूर जिल्हास्तरीय आंबा महोत्सव रद्द

लातूर, दि. २२ : जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हास्तरीय आंबा महोत्सवाचे २३ व २४ मे २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मैदानावर आयोजन करण्यात आले होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सततचा पाऊस सुरु असल्याने आणि आगामी काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असल्याने जिल्हास्तरीय आंबा महोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव आणि आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके यांनी कळविले आहे.

## पानगाव रस्त्याला पुर्नमंजुरी आणि ३ हजार मे. टन क्षमतेचे नवीन गोडाऊन मंजूर केल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचे मानले आभार



लातूर दि २२ - गेल्या अनेक वर्षापासून पानगाव आणि परिसरातील नागरिकांना त्रासदायक ठरत असलेल्या पानगाव ते खरोळा पाटी दरम्यानच्या १४.२० किलोमीटर रस्त्याच्या कामाला लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून पुनर्मंजुरी मिळाली सदरची मंजुरी मिळून दिल्याबद्दल पानगाव आणि परिसरातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आ. कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

रेणापूर तालुक्यातील पानगाव ते खरोळा पाटी दरम्यान रस्त्यालगतच्या काहीनी अडचणी निर्माण केल्याने या मार्गाचे काम रखडले होते. नागरिकांची अडचण आणि गैरसोय लक्षात घेऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जुन्या काळात अस्तित्वात असलेला रस्ता अरुंद असल्याने सिमेंट काँक्रीटचा रस्ता करणे शक्य नसल्याने सिमेंट काँक्रीट ऐवजी डांबरीकरणाचा नव्याने प्रस्ताव दाखल करून सदरील प्रस्ताव मंजुरीसाठी संबंधित मंत्री महोदयासह वरिष्ठाकडे वेळोवेळी प्रयत्न केले.

आ. कराड यांनी केलेल्या प्रयत्नामुळे शासनाने पानगाव ते खरोळा पाटील दरम्यान महामार्गाच्या एकूण १४.२० किमी लांबीच्या रस्त्याला मान्यता देण्यात आली आहे. या कामासाठी ४२ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्र वखार महामंडळाच्या माध्यमातून पानगाव येथे तीन हजार मॅट्रिक टन क्षमतेचे नवीन आधुनिक गोडाऊन उभारणीसाठी मंजुरी मिळवून घेतली. सदरील मंजुरी मिळवून दिल्याबद्दल पानगाव आणि परिसरातील भाजपाच्या लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांची लातूर येथील संवाद कार्यालयात भेट घेऊन त्यांचा यथोचित सत्कार केला व आभार व्यक्त केले यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर, पानगाव शहराध्यक्ष गणेश तुरुप, अमर चव्हाण, गोपाळ शेंडगे, माधव घुले, मारुती गालफाडे, संपत कराड, भूषण संपत्ते, बाबुराव कस्तुरे, वैजनाथ लहाने, संजय डोंगरे, आकाश ढोणे, श्याम पाठक, राम भंडारे, बालाजी फड यांच्यासह इतर अनेक जण होते.

# ५:२ डाएट आणेल डायबिटीसवर नियंत्रण, रिसर्चमध्ये खुलासा; कसा कराल वापर

मधुमेह हा एक जुनाट चयापचय रोग आहे, जो रुग्णाला आयुष्यभर राहतो. यावर अन्न आणि पेयांचा मोठा प्रभाव पडतो. त्यामुळे आहाराद्वारेही त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे. परंतु अलिकडच्या एका अभ्यासानुसार, डॉ. मायकल मोस्ली यांनी तयार केलेली ५:२ आहार योजना टाइप २ मधुमेह असलेल्या लोकांसाठी औषधापेक्षा जास्त फायदेशीर असल्याचे म्हटले गेले आहे. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला औषधाशिवाय मधुमेह नियंत्रित करायचा असेल, तर हा आहार योजना अर्थात डाएट प्लॅन नक्कीच वापरून पहा

खरं तर सध्या बदललेल्या लाइफस्टाईलमुळे ताणतणावाचे जीवन आपण जास्त जगत आहोत आणि यामुळे अगदी तरूण पिढीमध्येही टाइप २ डायबिटीस वाढताना दिसून येत आहे. वेळीच यावर नियंत्रण आणणे महत्त्वाचे आहे आणि यासाठी सतत औषधं घेण्यापेक्षा नवा डाएट प्लॅन मदत करेल असा रिसर्चमध्ये खुलासा करण्यात आलाय. नक्की काय आहे हा डाएट प्लॅन आपण जाणून घेऊया

५:२ डाएट प्लॅन हा इंटरमिटेंट फास्टिंगप्रमाणेच प्रक्रिया आहे. यामध्ये पाच दिवस सतत कोणत्याही निर्बंधाशिवाय खाणे आणि दोन दिवस सतत खाल्ल्याने ५००-६०० कॅलरीज कमी करणे समाविष्ट आहे. या आहारामागील सिद्धांत असा आहे की मर्यादित कॅलरीज असलेल्या दिवसानंतर, शरीर चरबी जाळण्यासाठी अन्नातून निर्माण होणारी ऊर्जा वापरण्यास सुरुवात करते. हा सिद्धांत वापरल्यास तुम्हाला डायबिटीसवर नियंत्रण मिळवणे अधिक सोपे जाईल असा दावा या रिसर्चमध्ये करण्यात आला आहे.

जामा नेटवर्क ओपन जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, अशा खाण्याच्या पद्धतीने अर्थात या डाएट प्लॅनचे पालन केल्याने ग्लायसेमिक नियंत्रणात तसेच लठ्ठपणा कमी



होण्यास मदत होते. याचा औषधापेक्षा परिणाम चांगला आहे असेही सांगण्यात आले आहे.

४०५ प्रौढांवर केलेल्या या अभ्यासातून असे दिसून आले की ५:२ आहार योजनेचे पालन केल्याने मेटफॉर्मिन आणि एम्पाग्लिफ्लोझिनपेक्षा चांगले ग्लायसेमिक नियंत्रण (रक्तातील ग्लुकोज पातळी) मिळते. ज्यामुळे ते टाइप २ मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी औषधाचा एक उत्तम पर्याय बनते.

तीन महिन्यांत परिणाम

संशोधकांनी नोंदवले आहे की ५:२ आहाराचे पालन करणाऱ्या मधुमेही रुग्णांच्या सरासरी व्क्ल-१उ रक्तातील साखरेमध्ये तीन महिन्यांत लक्षणीय घट झाली. याशिवाय, कंबर आणि कंबरेच्या चरबीतही घट दिसून आली. त्यामुळे तुम्हाला जर डायबिटीस असेल तर तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्याने या नव्या डाएट प्लॅनचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करून घेऊ शकता.

टीप - हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# उपआयुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांना ‘वॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम’ व ‘केंद्रीय कार्यकारी समिती’ यांच्यावतीने ‘विकासरत्न पुरस्कार’ प्रदान










नवी दिल्ली / प्रतिनिधी :- लातूर शहरात प्रशासनाच्या माध्यमातून भरीव कार्य करणारे उपआयुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांना ‘वॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम’ व ‘केंद्रीय कार्यकारी समिती’ यांच्यावतीने ‘विकासरत्न पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार म्हणजे लातूर शहरात त्यांनी केलेल्या प्रभावी कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर घेतलेली दखल होय. , प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे, नागरिकांशी थेट संवाद साधून समस्यांचे तत्काळ निराकरण करणे, तसेच पोलिस प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी राबवलेले उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरले आहेत.उपआयुक्तांच्या नेतृत्वाखाली शहरात ‘जनसंवाद बैठक’, ‘सुरक्षा अभियान’, अशा अनेक उपक्रमांची अंमलबजावणी झाली. त्यामुळेच त्यांना मिळालेला ‘विकासरत्न’ पुरस्कार हा लातूरसह संपूर्ण मराठवाड्यासाठी गौरवाची बाब मानली जात आहे.लातूर शहराच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या उपआयुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांना त्यांच्या उत्कृष्ट प्रशासनिक कार्यासाठी ‘विकासरत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्कारामुळे लातूर शहराच्या विकासातील त्यांच्या योगदानाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

आरोग्य क्षेत्रात भरीव कामगिरी

डॉ. खानसोळे यांच्या नेतृत्वाखाली लातूर महानगरपालिकेने आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या संकल्पनेतून दर महिन्याच्या २९ आणि ३० तारखेला विविध वॉर्डांमध्ये आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. उदाहरणार्थ, ९ मे २०२५ रोजी आयोजित १४ ठिकाणच्या शिबिरांमध्ये ८६७ नागरिकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या शिबिरांमध्ये रक्तदाब, मधुमेह, आणि इतर सामान्य आजारांची तपासणी करून मोफत औषधोपचारही देण्यात आले.

सामाजिक माध्यमांवरील सकारात्मक प्रतिसाद.

लातूर शहरातील विविध उपक्रमांची माहिती आणि त्यावर नागरिकांचा प्रतिसाद सोशल मीडियावरही पाहायला मिळतो. उपआयुक्तांच्या कार्यशैलीची प्रशंसा करणारे अनेक पोस्ट्स आणि कमेंट्स फेसबुक, ट्विटर यांसारख्या प्लॅटफॉर्मवर दिसून येतात. यामुळे प्रशासन आणि नागरिकांमधील संवाद अधिक सशक्त झाला आहे.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील.

डॉ.खानसोळे यांनी लातूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांमध्ये उपक्रम राबवले आहेत. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, आणि नागरी सुविधा यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे शहरात सकारात्मक बदल घडून आले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने पारदर्शकता, कार्यक्षमता, आणि नागरिकांच्या सहभागावर भर दिला आहे.

‘विकासरत्न’ पुरस्कार; शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे उल्लेखनीय योगदान.

‘विकासरत्न’ पुरस्कार; शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे उल्लेख

# अनुसूचित जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारीचे १० जून रोजी केज येथे आयोजन



केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीमधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन १० जून २०२५ रोजी केज शहरातील महात्मा फुले नगर भागातील जे के फंक्शन हॉल येथे करण्यात आले आहे. तरी इ.१० वी व १२ वी २०२५ च्या परीक्षेत ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करून घ्यावी. असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे यांनी केले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, विद्यार्थ्यांचे मनोबल वाढावे व त्यांना ऊर्जा मिळावी आणि विद्यार्थ्यांनी डॉक्टर,इंजिनिअर, कलेक्टर, आयपीएस अधिकारी, वकील बनावेत याकरिता सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे यांच्या पुढाकारातून फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या परीक्षेमध्ये इ. दहावी व बारावी विज्ञान शाखेतून ८० टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन गुणवत्ता यादीत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन आझाद क्रांती सेना व बहुजन ज्येष्ठ नागरिक मंच, केज यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांनी व पालकांनी दिनांक ३० मे २०२५ पर्यंत आपली नाव नोंदणी करून घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे यांनी केले आहे. गुणवंत विद्यार्थी व पालकांनी वरील वेळेमध्ये आपल्या पाल्यांचे नाव, गुणपत्र (मार्क मेमो) सत्कार आयोजक समितीचे प्रा.रमेश पाटोळे केज मो. नं.९०११९९३७००, प्रा. विक्रम गालफाडे केज मो.नं.९०९६९२८६३०, रमेश ढगे माजलगाव मो.नं.९९२११३५५३६, भिवाजी जोगदंड बीड मो. नं.९७६६५३७९४२, सचिन गालफाडे केज ९६८९९३७११५, बळीराम मस्के धारूर मो. नं.९६९९७५८७९२ या व्हाट्सअप वर नाव नोंदणी करुन घेण्यात यावी. दिनांक १० जून २०२५ रोजी ठीक सकाळी ११-०० वाजता जे के फंक्शन हॉल महात्मा फुले नगर केज येथे इयत्ता दहावी व बारावी परीक्षेमध्ये ८०% पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांनी वर दिलेल्या व्हाट्सअप नंबर वर आपली नाव नोंदणी करून घ्यावी. व सत्कार आयोजन समितीकडे संपर्क साधावा. असे आवाहन आझाद क्रांती सेना व बहुजन ज्येष्ठ नागरिक मंच,केज च्या वतीने करण्यात आले आहे.

# केज तालुक्यात अवकाळी पावसामुळे पिकाला दिलासा मांजरा धरणाच्यादोन्ही कालव्यातुन पाण्याचा विसर्ग बंद..!

शेतीसाठी पाण्याचा असा आहे वापर उजवा कालवा :- २५.७१२ दलघमी डावा कालवा : - २८.१३३ दलघमी सिंचनासाठी नदीद्वारे पाण्याचा विसर्ग: २२.६५४ मान्सूनपूर्व पावसाने उन्हाळी पिकांना दिलासा मिळाला असून सद्यस्थितीत पिकांसाठी पाण्याची मागणी नसल्या मुळे मांजरा धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यातुन सुरू असलेले तिसरे उन्हाळी आवर्तन बंद करण्यात आले आहे. ढगाळ वातावरणामुळे मागील आठ दिवसापासून पाण्याचे बाष्पीभवन देखील कमी प्रमाणात झालेले आहे .सद्यस्थितीत प्रकल्पात १८.८६ % इतका उपयुक्त पाणीसाठा आसल्याची माहिती धनेगाव येथील मांजरा धरणाचे शाखा अभियंता सुरज निकम यांनी बोलताना दिली.

केज/प्रतिनिधी गेल्या आठ दिवसापासून केज तालुक्यात ढगाळ वातावरण व मान्सूनपूर्व अवकाळी पाऊस पडत असल्यामुळे उन्हाळी हंगामात ऊसासह ईतर पिकांना चांगलाच दिलासा मिळाला असून तालुक्यातील मांजरा धरणातून डाव्या व उजव्या कालव्याद्वारे सिंचनासाठी सुरू असलेल्या उन्हाळ्यातील तिसऱ्या आवर्तनात सुरु असलेला पाणी पुरवठा बुधवारी सकाळी ६:०० वाजल्यापासून बंद करण्यात आला आहे. २२४.०९३ दलघमी साठवण क्षमता आसलेल्या मांजरा धरणात सध्या स्थितीत ३३.४०३ दलघमी इतका उपयुक्त पाणीसाठा आहे. या धरणातून लातूर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यातील लातूर शहर, एमआयडीसी, अंबाजोगाई, केज, धारूर, कळंब या प्रमुख शहरांसह ६३ गावांसाठी पाणीपुरवठा केला जातो. व या तीनही जिल्ह्यातील ७३ गावांतील १८ हजार २२३ हेक्टर जमीन सिंचनाखाली येते. अप्रत्यक्षरित्या उपसा सिंचनाद्वारे तीन जिल्ह्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येते.

# कुंबेफळ येथील सिद्धिविनायक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न




केज/प्रतिनिधी लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ केज संचलित, सिद्धिविनायक विद्यालय कुंबेफळ येथे इयत्ता दहावी परीक्षेचा २०२५ चा निकाल १०० टक्के लागला असुन यामध्ये एकूण ५४ विद्यार्थ्यांपैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये कु.योगिता थोरात ९२.४० टक्के,कु.शितल पंडित ९२.२० टक्के,कु.अनुष्का थोरात ९२.२० टक्के,कु.प्रतिक्षा सुरवसे ९१.८० टक्के,कु.प्रगती थोरात ९०.४० टक्के,चि.नैतिक थोरात ९०.२० टक्के या सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे पालकांसमवेत शाल,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष पी.एम.बोबडे, मुख्याध्यापक एस.एस.सपाटे यांच्यासह सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी,पालक, नागरिक उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्वागत केले व अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# नागरिकांनी ‘दामिनी’ अ‍ॅप वापरावे: विभागीय आयुक्त दिलीप गावडे

छत्रपती संभाजीनगर, दि.२२:- मान्सून कालावधीत विशेषत: जून व जुलै या महिन्यात वीज पडण्याचे प्रमाण लक्षात घेता जीवितहानी टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दामिनी अ‍ॅप वापरण्याचे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी केले आहे. सुरक्षात्मक उपाययोजना म्हणून सर्व शासकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी, क्षेत्रीय अधिकारी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून, महसूल सहाय्यक, सरपंच, पोलिस पाटील, तलाठी, कृषिसेवक, कोतवाल, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक, ग्रामपंचायत संगणक परिचालक आणि नागरिकांनी अ‍ॅपचा वापर करावा. दामिनी अ‍ॅप गुगल प्लेस्टोअरवर या लिंकवरुन डाऊनलोड करता येईल. या पमध्ये जीपीएस स्थळाद्वारे वीज पडण्याच्या १५ मिनिटांपूर्वी स्थिती दर्शविण्यात येते. अ‍ॅपमध्ये आपल्या सभोवतालीच्या परिसरात वीज पडण्याची सूचना प्राप्त होताच त्या ठिकाणापासून सुरक्षित स्थळी स्थालंतरीत व्हावे. यावेळी झाडाचा आश्रय घेऊ नये. गावातील सर्व स्थानिक शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी प डाऊनलोड करून त्यामध्ये प्राप्त सुचनेनुसार गावातील नागरिकांना पूर्वसूचना द्यावी आणि होणारी जीवितहानी टाळण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, असे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे. वीज पडण्याची शक्यता असल्यास घ्यावयाची काळजी काय करावे: - विजा चमकत असताना शक्यतो घरात किंवा सुरक्षित बंदिस्त जागेत आसरा घ्या. इमारत, गुहा, खड्डा हे सुरक्षित ठिकाण असू शकतात. - घरात असाल तर दारं-खिडक्या बंद करा, त्यापासून लांब राहा. - विद्युत उपकरणे (टीव्ही, फ्रिज, मिक्सर, हेअर ड्रायर, रेझर) बंद करा आणि प्लगमधून काढा. - पाण्यापासून, धातूच्या वस्तूंपासून आणि उंच झाडांपासून दूर राहा. - बाहेर असाल तर झाडाखाली किंवा उंच जागी उभे राहू नका; शक्यतो सुरक्षित आसरा मिळवा. - शेतात असाल तर दोन्ही पाय गुडघ्याजवळ घेऊन खाली बसा, कानावर हात ठेवा आणि जमिनीशी कमीतकमी संपर्क ठेवा. - पाण्यात असाल तर त्वरित बाहेर या. - विजेचा प्रभार जाणवला (केस उभे राहणे, त्वचेला मुंग्या येणे) तर त्वरित जमिनीवर ओणवे व्हा किंवा गुडघ्यात मान घालून बसा. - मुलं आणि पाळीव प्राणी घरात आहेत याची खात्री करा. काय करू नये: - विजा चमकत असताना घराबाहेर जाऊ नका, प्रवास टाळा. - मोठ्या झाडाखाली किंवा उंच जागी उभे राहू नका. - धातूच्या वस्तू, लोखंड, तांबे जवळ ठेवू नका किंवा त्यांना स्पर्श करू नका. - टेलिफोन, मोबाईल चार्जिंग, किंवा इतर विद्युत उपकरणांचा वापर टाळा. - वाहत्या पाण्यात किंवा ओल्या भिंतींना, धातूच्या नळांना स्पर्श करू नका. - अफवांवर विश्वास ठेवू नका; अधिकृत माहितीच ग्राह्य धरा. वीज पडल्यानंतर: - व्यक्तीवर वीज पडल्यास श्वास व हृदयाचे ठोके तपासा, कृत्रिम श्वास किंवा कार्डिआक कॉम्प्रेशन द्या, आणि त्वरित रुग्णालयात घेऊन जा.

# आमचं ग्रीन लातूर वृक्ष फा. ने २५००० बिजगोळे तयार करून केली हरीत विचारांची पेरणी

आज दिनांक २२/०५/२०२५ जून महिन्यात हजर होणाऱ्या मान्सूनची चाहूल लागताच, आपल्या लातूर शहर व परिसरात हरीत अच्छादन वाढावे यासाठी नवनवीन उपक्रम करत प्रयत्नशील असणारी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फा.

आज शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था लातूर, आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन, रोटरी क्लब ऑफ लातूर, लायन्स क्लब लातूर, लिनेस क्लब लातूर, ज्येष्ठ नागरिक संघ लातूर, चैतन्य हास्य क्लब, ममता हॉस्पिटल विश्वस्त, रोटरी क्लब लातूर श्रेयस, इनर व्हील क्लब ऑफ लातूर, नाना नानी पार्क येथील योग वर्गाचे साधक, महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा, पर्यावरण प्रेमी नागरिक, लातूर फ्लाइंग क्लब, महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांनी निसर्गसेवेसाठी आपले योगदान देऊन आज २५ हजार पेक्षा अधिक सीड बॉल, बीज गोळे बनविले. त्यासाठी अश्वगंधा, शतावरी, रिठा, बेहडा, लाजाळू अंबाडी, पारसपिंपळ, पिंपळ, बहावा, बावची, लाल गुंजा, काळी गुंजा, पांढरी गुंजा, वावडिंग, पारिजातक, अळीव, चिक्कू, शेवगा, गोकर्ण, बडीशोप, चित्रक, रिंगणी, गोखरू, पटोल, करंज, चिंच, बकुळ, लताकरंज, आपटा, तुळस, सब्जा, सूर्यफूल, इंद्रजव, शिवलिंगी बी, करडी, कारळ, पपई, राजमा,अळीव, कमळ बी, गुलमोहर, बावची,गजगा,

यांच्या ८ किलो बिया दोन हजार किलो माती शेणखत यांचे मिश्रण करून

१५० सदस्यांनी प्रत्येकी २०० सीड बॉल बीज गोळे बनविले.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था लातूर येथे आज दिनाक २२ मे रोजी सकाळी सहा ते आठ या दोन तासाच्या वेळात २५ हजार पेक्षा अधिक बीज गोळे बनविण्यात आले.

घराघरांमध्ये पर्यावरण पूरक विचार रुजला गेला पाहिजे यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला, शहरातील सर्वच वयोगटातील व्यक्ती उदा. बाल, तरुण आणि वृध यांच्या मनावर एकप्रकारे हरीत संस्कार करण्यात आले.



मागील २१८३ दिवसापासून अविरत आमचं ग्रीन लातूर वृक्ष फा. च्या माध्यमातून लातूर शहरात सर्वत्र झाडांची लागवड होऊन लातूर हरित दिसत आहे. परंतु जेथे दुर्गम भाग आहे, जिथे वृक्षारोपणासाठी अडचणीचा भाग असेल, डोंगर, दरी याठिकाणी बीजगोळ्यांच्या माध्यमातून लागवड केली जाणार आहे.

या प्रयत्नातून लातूरच नव्हे तर लातूरच्या आजूबाजूचा परिसर देखील हरित आणि पर्यावरणास पूरक करण्यामध्ये यश मिळेल.

मागील सहा वर्षांपासून ग्रीन लातूर वृक्ष च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सीडबॉल बनवले जात आहेत.

यावेळेस सीड बॉल विशेषता म्हणजे यात आयुर्वेदिक वनस्पतींच्या बियांचा वापर केला आहे. यामुळे आयुर्वेदात उपयोगी असलेली वनसंपदा नक्कीच वाढीला लागेल.

घरामध्ये आणलेली फळे खाऊन झाल्यावर त्याच्या बिया फेकून न देता बीज गोळ्याच्या माध्यमातून पर्यटनास गेल्यावर तिथे उपयोग करावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वी करण्याकरिता शासकीय औद्योगिक महाविद्यालय प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जाधव सर, आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनचे डॉ. पवन लड्डा, डॉ. भास्कर बोरगावकर, प्रा. मीनाक्षी बोंडगे,प्रा. रक्षा डांगे, प्रा. अभिलाष सर, यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि उपक्रमा बद्दलची विस्तृत माहिती ॲड. वैशाली यादव यांनी दिली तर या उपक्रमास योगदान देणाऱ्यांचे आणि उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ. पवन लड्डा यांनी मानले.

सदर कार्यक्रमास आमचं ग्रीन लातूर वृक्ष फा. सर्वच सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE